नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २४८ | Issue - 248 | वार बुधवार दि. २८ जानेवारी २०२६ | Blow- Wednesday Date 28 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## 'मदर ऑफ ऑल डील'वर स्वाक्षरी


### भारत व युरोपियन युनियनमध्ये मुक्त व्यापार कराराची अधिकृत घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारत आणि युरोपियन युनियनमध्ये मुक्त व्यापार कराराची अधिकृत घोषणा मंगळवारी करण्यात आली आहे. भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील 'मदर ऑफ ऑल डील'वर स्वाक्षरी करण्यात आली आहे. त्यामुळे भारतासाठी हा ऐतिहासिक निर्णय मानला जात आहे. भारत व युरोपियन संघातील या मुक्त व्यापार कराराची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. भारत आणि युरोपियन युनियनमधील करार म्हणजे 'सर्व करारांची जननी' असल्याचे भाष्य पंतप्रधान मोदींनी केले आहे.

'भारत-युरोपियन युनियन व्यापार करारामुळे भारतातील उत्पादन वाढेल आणि देशातील सेवा आणि संबंधित क्षेत्रांचा मोठ्या प्रमाणात विस्तार होण्यास मदत होईल. सर्व करारांची जननी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मुक्त व्यापार करारामुळे जागतिक व्यवसाय आणि गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास आणखी दृढ होईल', असे मोदींनी म्हटले आहे.

'हा व्यापार करार जागतिक पुरवठा साखळींना आणखी बळकटी देईल. भारतातील विविध क्षेत्र, जसे की कापड व्यवसाय, रत्न, दागिने यासह आदींना उद्योगांना या व्यापार कराराचा फायदा होणार आहे. जगातील लोक 'सर्व करारांची जननी' म्हणून या कराराची चर्चा करतील. या करारामुळे सर्व भारतीय आणि युरोपीयन देशांमधील लाखो लोकांसाठी मोठ्या संधी उपलब्ध होतील. जगातील दोन प्रमुख अर्थव्यवस्थांमधील समन्वयाचे हे एक अद्भुत उदाहरण ठरले आहे. हा करार जागतिक जीडीपीच्या अंदाजे २५ टक्के व जागतिक व्यापाराच्या एक तृतीयांश भागाचे प्रतिनिधित्व करतो', असे मोदींनी म्हटले आहे.



'या व्यापार करारामुळे भारतातील उत्पादनाला फक्त चालना मिळणार नाही, तर सेवांशी संबंधित सर्व क्षेत्रांचा विस्तारही होण्यास मदत होईल. या मुक्त व्यापार करारामुळे जगातील प्रत्येक व्यवसाय व गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास आणखी दृढ होईल, असा आशावाद मोदी यांनी व्यक्त केला आहे.

रोजगाराच्या नव्या संधी या करारामुळे २०३२ पर्यंत भारत-युरोपीय संघ व्यापार दुप्पट होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. यासोबतच भारतात लाखो थेट आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होतील. विशेषतः उत्पादन, सेवा आणि एमएसएमई क्षेत्राला मोठा फायदा होणार आहे.

कॅनडाचा मैत्रीचा हात पुढे अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमक्यांमध्ये भारताने युरोपियन युनियनसोबत आपली मैत्री आणखी मजबूत केली आहे. भारताने युरोपियन युनियनसोबत मुक्त व्यापार करार केला आहे. ज्याला मदर ऑफ ऑल डिल्स असे म्हटले जाते. दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत या करारावर शिक्कामोर्तब झाले. दुसरीकडे कॅनडाही भारतासोबत संबंध मजबूत करण्याचा विचार करत आहे. कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी येत्या मार्चमध्ये भारत दौऱ्यावर येण्याची शक्यता आहे. तर त्यांचे मंत्री टीम हॉजसन याच आठवड्यात भारत दौऱ्यावर येत आहेत.

एकीकडे युरोपियन युनियनसोबत भारत करार करत आहे तर दुसरीकडे कॅनडाही भारतासोबत संबंध सुधारण्याचा प्रयत्न करत आहे. कॅनडाचे पंतप्रधान भारत दौरा करण्याच्या विचारात आहेत. कार्नी मार्चच्या पहिल्या आठवड्यात भारतात येऊ शकतात. त्यावेळी युरेनियम एनर्जी, मिनरल्स, आर्टिफिशियल इंटेलिजेंस डीलवर स्वाक्षरी होऊ शकते. मागील वर्षी कॅनडाचे पंतप्रधान कार्नीच्या आमंत्रणावरून भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी ७ समिटमध्ये सहभागी झाले होते. कार्नी यांच्या मंत्रिमंडळातील अनेक मंत्री भारतात आले आहेत. कॅनडातील भारताचे उचायुक्त दिनेश पटनायक यांनी कार्नी यांच्या भारत दौऱ्याबाबत माहिती दिली. गेली २ वर्ष कॅनडासोबत चर्चा थांबल्यानंतर आता पुन्हा दोन्ही देश संबंध सुधारण्यासाठी पुढे येत आहेत.

अमेरिकेचा जळफळाट स्कॉट बेसेंट यांनी युरोपियन युनियनवर थेट रशिया-युक्रेन युद्धाला निधी पुरवल्याचा आरोप करत युरोपियन युनियन स्वतः विरुद्धच्या युद्धाला फायनान्स करत असल्याचा आरोप केला. स्कॉट बेसेंट यांनी म्हटले की, 'गेल्या आठवड्यात काय घडले? याचा विचार करा, आम्ही भारतावर कर लादला आणि युरोप त्यांच्यासोबत व्यापार करार करत आहे. रशिया त्यांचे कच्च तेल भारतात पाठवतो. भारतात तेल शुद्ध केले जाते आणि नंतर युरोपला विकले जाते. तांत्रिकदृष्ट्या युरोप हे शुद्ध उत्पादन खरेदी करत आहे, जे प्रत्यक्षात रशियन तेल आहे. ते (युरोपियन देश) स्वतःविरुद्ध युद्धासाठी निधी पुरवत आहेत', असे स्कॉट बेसेंट यांनी म्हटले आहे.

काय-काय वस्तू स्वस्त होणार? या करारामुळे आपल्या दैनंदिन आयुष्याशी संबधित वापराच्या आणि औद्योगिक वस्तू स्वस्त होण्याची शक्यता आहे. यात कारपासून ते केमिकल्सपर्यंत, तसेच वाइन, बिअर आणि मद्यपदार्थांचे दरही कमी होऊ शकतात. हा करार मद्य, अन्नपदार्थ, रसायने, मशीनरी, औषधे आणि एअरोस्पेस क्षेत्रातील किमती कमी करू शकतो.

## मतदानापूर्वीच महायुतीचे २२ उमेदवार बिनविरोध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील जिल्हा परिषद (नझ) आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. त्यामुळे, १५ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितीच्या निवडणुकांमधील अंतिम लढतीचे चित्र स्पष्ट झाले असून आता प्रचाराचा धुरळा उडणार आहे. मात्र, तत्पूर्वीच काहींनी विजयाचा गुलाल उधळला. त्यामध्ये, कोकण अग्रेसर राहिला असून कोकणात महायुतीने विजयी खाते उघडले आहे. तळकोकणात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकी (एश्रशलींळेप) आधीच महायुतीचे (चरहर्लीीं‌ळ) तब्बल २१ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यात, रायगड जिल्ह्याच्या महाड पंचायत समिती निवडणुकीत सवाने धामणे गणातून उभे असलेले अनिल जाधव बिनविरोध आल्याने महायुतीचे एकूण २२ उमेदवार बिनविरोध झाले आहेत. त्यामुळे, सिंधुदुर्ग आणि रायगडमध्येही महायुतीने विजयाचा आनंद साजरा केला.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत भाजपने १९ तर शिंदे सेनेने २ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. जिल्हा परिषद मध्ये खारेपाटण जिल्हा परिषद उमेदवार प्राची इस्वालकर, बांदा जिल्हा परिषद उमेदवार प्रमोद कामत, पडेल जिल्हा परिषद उमेदवार सुयोगी घाडी, बापर्डे जिल्हा परिषद उमेदवार अवनी तेली, कोळपे जिल्हा परिषद उमेदवार प्रमोद रावराणे, किंजवडे जिल्हा परिषद उमेदवार सावी लोके या भाजपकडून बिनविरोध झाल्या आहेत. तर, जाणवली जिल्हा परिषद उमेदवार रुहिता तांबे या शिंदेंच्या शिवसेना उमेदवारही बिनविरोध निवडून आल्या आहेत. त्यामुळे, मतदानापूर्वीच या उमेदवारांनी विजयाचा गुलाल उधळला. येथील पंचायत समितीमध्ये बिडवाडी पंचायत समिती संजना राणे, वरवडे पंचायत समिती सोनू सावंत, कोकीसरे पंचायत समिती साधना नकाशे, पडेल पंचायत समिती अंकुश ठूकरूल, नाडण पंचायत समिती गणेश राणे, बापर्डे पंचायत समिती संजना लाड, नाटळ पंचायत समिती सायली कृपाळ, नांदगाव पंचायत समिती हर्षदा वाळके, शिरगाव पंचायत समिती शीतल तावडे, फणसगाव पंचायत समिती समृद्धी चव्हाण, जाणवली पंचायत समिती महेश्वरी चव्हाण, आडवली मालडी पंचायत समिती सीमा परुळेकर, आसोली पंचायत समिती संकेत धुरी हे भाजपचे उमेदवार बिनविरोध झाले आहेत. तर कोळझर पंचायत समितीमध्ये शिंदेंच्या शिवसेनेचे गणेशप्रसाद गवस उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यात उबाठा सेनेच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने हे उमेदवार बिनविरोध झाले आहेत. दोडामार्ग तालुक्यातील कोलझर पंचायत समिती महायुतीचे उमेदवार गणेशप्रसाद गवस बिनविरोध. ठाकरे शिवसेनेचे प्रवीण परब यांनी माघार घेतल्याने गणेशप्रसाद गवस निवडून आले आहेत. गवस हे शिंदेंच्या शिवसेनेचे दोडामार्ग तालुकाप्रमुख म्हणून काम पाहत असून कोलझर पंचायत समितीमधून ते बिनविरोध निवडून आले आहेत.

### झेडपी अन् पंचायत समितीला महापालिकेचा पॅटर्न

रायगडमध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत महाडमधून शिंदे शिवसेनेला शुभ संकेत मिळाला आहे. महाड पंचायत समिती निवडणुकीत सवाने धामणे पंचायत समिती गणातून उभे असलेले अनिल जाधव यांच्या विरोधात असलेल्या उमेदवारांनी शेवटच्या दिवशी माघारी घेतल्याने अनिल जाधव हे बिनविरोध निवडणून आले आहेत. त्यामुळे शिंदे शिवसेनेने आपला पहिला बिनविरोध विजय मिळवत रायगडमध्ये जल्लोष केला. मंत्री भरत गोगावले यांचे सुपुत्र विकास गोगावले यांनी शिवसैनिकांना पेढा भरवत आनंद साजरा केलाय.

## संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला बुधवारपासून (दि. २८ जानेवारी) सुरुवात होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने अधिवेशनाला सुरुवात होईल. राष्ट्रपती लोकसभा आणि राज्यसभेला संयुक्तपणे संबोधित करतील. या अभिभाषणातून केंद्र सरकारच्या आजवरच्या कार्यकाळाचा आढावा तसेच आगामी काळातील धोरणात्मक दिशा स्पष्ट केली जाण्याची शक्यता आहे.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर दोन्ही सभागृहांमध्ये त्यावरील धन्यवाद प्रस्ताव मांडण्यात येईल. गुरुवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आर्थिक सर्वेक्षण सादर करतील. या सर्वेक्षणातून देशाची आर्थिक स्थिती, विकासदर, रोजगार, महागाई आणि विविध क्षेत्रांतील कामगिरींचे चित्र समोर येणार आहे. १ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थमंत्री देशाचा अर्थसंकल्प सादर करतील.

### १ फेब्रुवारीला सादर होणार अर्थसंकल्प; गुरुवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आर्थिक सर्वेक्षण सादर करतील

नवव्यांदा अर्थसंकल्प सादर करणार : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन सलग नवव्यांदा देशाचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. यानिमित्त सलग नऊ वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम त्यांच्या नावे होणार आहे.



१३ फेब्रुवारीपर्यंत अधिवेशनाचा पहिला टप्पा

२८ जानेवारीपासून सुरू होत असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा १३ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. या काळात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर चर्चा होऊन तो मंजूर केला जाईल.

केंद्रीय अर्थसंकल्पावरही सविस्तर चर्चा केली जाईल. त्यानंतर काही दिवसांची विश्रांती असेल. अधिवेशनाचा दुसरा टप्पा ९ मार्चपासून सुरू होऊन २ एप्रिलपर्यंत चालेल.

### जिल्हा परिषदेच्या ८ गटासाठी व पंचायत समितीच्या १६ गणासाठी होणार मतदान प्रक्रिया

## पंढरपूर तालुक्यातील दोन लाख ८५ हजार ८२७ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ०८ गटासाठी व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या १६ गणासाठी दि.०५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. मतदानासाठी तालुक्यातील एक लाख ४८ हजार ९०२ पुरुष मतदार तर एक लाख ३६ हजार ९१९ स्त्री मतदार तसेच इतर ०५ अशा एकूण दोन लाख ८५ हजार ८२७ मतदारांचा समावेश असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन लंगुटे यांनी दिली.

जिल्हा परिषदेचा करकंब गटासाठी सर्वसाधारण आरक्षण असून ३६ हजार ७०८ इतके मतदार आहेत. त्यामध्ये उंबरे गण (सर्वसाधारण) १७ हजार २२० , करकंब गण (सर्वसाधारण) १९ हजार ४८८ इतके मतदार आहेत.भोसे गट सर्वसाधारण महिला आरक्षित आहे. या गटात ३२ हजार ५८५ मतदार आहेत. त्यामध्ये भोसे गण(नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला) १८ हजार २३५, गुरसाळे गंण (सर्वसाधारण) १४ हजार ३५० असे मतदार आहेत.



रोपळे गट अनुसूचित जाती महिला आरक्षित आहे. या गटात ३८ हजार ६४८ इतके मतदार आहेत. त्यामध्ये रोपळे गण (सर्वसाधारण महिला) १८ हजार ६३५ , सुस्ते गण (अनुसूचित जाती महिला) २० हजार १३ असे मतदार आहेत. गोपाळपूर गट सर्वसाधारण महिला आरक्षित आहे. या गटात ३५ हजार १६४ मतदार आहेत. यामध्ये पुळूज गण (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला) १९ हजार ४३४, गोपाळपूर गणा (सर्वसाधारण महिला) १५ हजार ७३० मतदारांचा समावेश आहे.

वाखरी गट सर्वसाधारण महिला आरक्षित आहे. या गटात ३३ हजार ७४२ इतके मतदार आहेत.यामध्ये वाखरी गण (नागरिकांचा मागास प्रवर्ग) १६ हजार ९६४, पटवर्धन कुरोली गण (सर्वसाधारण महिला) १६ हजार ७७८ इतके मतदार आहेत. भाळवणी गट अनुसूचित जाती महिला आरक्षित आहे. या गटात ३४ हजार ४८ इतके मतदार आहेत. यामध्ये भाळवणी गण(नागरिकांचा मागास प्रवर्ग )१६ हजार ४०८, पळशी गण (अनुसूचित जाती महिला) १७ हजार ६४० इतके मतदार आहेत.

टाकळी गट अनुसूचित जाती आरक्षित आहे. या गटात ४० हजार ८८५ इतके मतदार आहेत. यामध्ये टाकळी गण (सर्वसाधारण) २० हजार २६५ , खर्डी गण (अनुसूचित जाती) २० हजार ६२० इतके मतदार आहेत. कासेगाव गट नागरीकांचा मागासवर्ग आरक्षित असून या गटात ३४ हजार ४७ इतके मतदार आहेत. यामध्ये कासेगाव गण (सर्वसाधारण)१७ हजार १५०, सरकोली(सर्वसाधारण महिला) १६ हजार ८९७ इतके मतदार आहेत.

## जिल्हा परिषद निवडणुकानंतर सातारा गॅझेट लागू होणार; मंत्रालयातील बैठकीत मराठा आरक्षणवर चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा शासन निर्णय घेण्यात आला. त्यामुळे, हैदराबाद गॅझेटियरच्या निर्णयानुसार मराठावाड्यातील अनेक मराठा बांधवांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ मिळण्यासही सुरुवात झाली आहे. मात्र, मराठा आंदोलक उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील (चरपेक्ष क्षरीरपसश) यांच्या उपोषणावेळी राज्य सरकारने हैदराबाद आणि सातारा गॅझेट लागू करण्यासंदर्भातील त्यांच्या मागण्या मान्य केल्या होत्या. त्यामुळे, हैदराबाद गॅझेटियर लागू झाले पण सातारा गॅझेटियर कधी लागू होणार? असा प्रश्न मराठा बांधवांना पडला आहे. सातारा गॅझेटियरचा लाभ साताऱ्यासह पश्चिम महाराष्ट्रातील मराठा बांधवांना होणार असल्याने या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आता, यासंदर्भात महत्त्वाची अपडेट समोर आली आहे.



मराठा आरक्षण उपसमितीची आज मंत्रालयात बैठक संपन्न झाली, उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वात या बैठकीत सातारा गॅझेटियरवर प्रामुख्याने चर्चा झाली. तसेच, हैदराबाद गॅझेटियर अंमलबजावणी आणि मराठा आरक्षण विषयावर आढावा घेण्यात आला. त्यानुसार, राज्यातील जिल्हा परिषद निवडणुकांनंतर सातारा गॅझेटियर लागू करण्यात येणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीनंतर सातारा गॅजेट लागू करण्यासंदर्भात निर्णय होण्याची शक्यता असल्याची सूत्रांची माहिती आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमुळे सातारा गॅजेट लागू करण्यास अडचणी येत आहेत. अशातच, फक्त इंटरप्रिटेशनचा भाग असल्याने यासंदर्भात देखील लवकरच निर्णय होणार असून समज-गैरसमज दूर करत मराठा आरक्षणासंदर्भात सातारा गॅजेट लागू करण्यासंदर्भात हालचाली सुरू झाल्या आहेत. राज्यात गेल्या काही महिन्यांपासून निवडणुकाची रणधुमाळी पाहायला मिळत आहे. आधी नगरपालिका निवडणुका, पुन्हा महापालिका आणि आता जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्रातील जवळपास सर्वच जिल्ह्यात आचारसंहिता लागू असल्याने राज्य सरकारला काही महत्त्वाचे निर्णय किंवा नागरिकांना थेट लाभ होईल, असे निर्णय घेतात येत नाहीत.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### मुक्त व्यापार करार

भारत आणि युरोपियन युनियनमध्ये मुक्त व्यापार कराराची अधिकृत घोषणा मंगळवारी करण्यात आली आहे. भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील 'मदर ऑफ ऑल डील'वर स्वाक्षरी करण्यात आली आहे. त्यामुळे भारतासाठी हा ऐतिहासिक निर्णय मानला जात आहे. भारत व युरोपियन संघातील या मुक्त व्यापार कराराची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. 'भारत-युरोपियन युनियन व्यापार करारामुळे भारतातील उत्पादन वाढेल आणि देशातील सेवा आणि संबंधित क्षेत्रांचा मोठ्या प्रमाणात विस्तार होण्यास मदत होईल. सर्व करारांची जननी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मुक्त व्यापार करारामुळे जागतिक व्यवसाय आणि गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास आणखी दृढ होईल. 'हा व्यापार करार जागतिक पुरवठा साखळींना आणखी बळकटी देईल. भारतातील विविध क्षेत्र, जसे की कापड व्यवसाय, रत्न, दागिने यासह आदींना उद्योगांना या व्यापार कराराचा फायदा होणार आहे. जगातील लोक 'सर्व करारांची जननी' म्हणून या कराराची चर्चा करतील. या करारामुळे सर्व भारतीय आणि युरोपीयन देशांमधील लाखो लोकांसाठी मोठ्या संधी उपलब्ध होतील. जगातील दोन प्रमुख अर्थव्यवस्थांमधील समन्वयाचे हे एक अद्भुत उदाहरण ठरले आहे. हा करार जागतिक जीडीपीच्या अंदाजे २५ टक्के व जागतिक व्यापाराच्या एक तृतीयांश भागाचे प्रतिनिधित्व करतो. या व्यापार करारामुळे भारतातील उत्पादनाला फक्त चालना मिळणार नाही, तर सेवांशी संबंधित सर्व क्षेत्रांचा विस्तारही होण्यास मदत होईल. या मुक्त व्यापार करारामुळे जगातील प्रत्येक व्यवसाय व गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास आणखी दृढ होईल. रोजगाराच्या नव्या संधी या करारामुळे २०३२ पर्यंत भारत-युरोपीय संघ व्यापार दुप्पट होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. यासोबतच भारतात लाखो थेट आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होतील. विशेषतः उत्पादन, सेवा आणि एमएसएमई क्षेत्राला मोठा फायदा होणार आहे.

# गोगांव येथील ग्रामपंचायत व जिल्हा परिषद शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा; सरपंच वनिता सुरवसे यांच्या हस्ते ध्वजारोहण

## जि. प. प्रा. शाळा गोगांव येथील बाल चिमुकल्या कलाकाराने प्रजासत्ताक दिन गाजविला






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील गोगांव येथील ग्रामपंचायत कार्यालया समोर सरपंच सौ वनिता सुरवसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी ग्रा. प.सदस्य श्री लक्ष्मण बिराजदार हे होते, प्रमुख उपस्थितीत उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, प्रदीप जगताप, शरणप्पा कलशेट्टी, ग्रामपंचायत अधिकारी विक्रम घाटे यासह गावातील मान्यवर उपस्थित होते. सुरुवातीला डॉ बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन डॉ लिंगराज नडगेरी,अंबिका वळसंग , मधुमती गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले ध्वजारोहण कट्टा पूजन माजी तंटामुक्त अध्यक्ष श्री सूर्यकांत जिरगे यांनी केले यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा परिषद शाळेत आयोजित कार्यक्रम अध्यक्ष स्थानी सरपंच सौ वनिता सुरवसे होत्या व प्रमुख उपस्थितीत उपसरपंच कमलाकर सोनकांबळे,प्रदीप जगताप विक्रम घाटे होते. प्रतिमा पूजन पोलीस पाटील सौ.चंद्रकला गायकवाड, कल्याणराव बिराजदार यांनी केले ध्वजारोहण कट्ट्याचे पूजन शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री शरणबसप्पा मुळजे यांनी केले. ध्वजारोहण मुख्याध्यापक पुंडलिक वाघमारे यांनी केले

दि.२६ जानेवारी २२६ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांचे कलागुनाना वाव देण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोगांव येथे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. येथील शालेय विद्यार्थी अर्थात बालचिमुकल्या कलाकाराने रंगमंच गाजवून टाकला. मनोरंजनातून शिक्षण, पाणीटंचाई,अंधश्रद्धा व महामानवांच्या विचाराचे प्रबोधन असे अनेक विषय मांडण्यात आले. तसेच लेझीम, नाट्यसंगीत, देशभक्ती वरील गाण्यासह विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. सरपंच सौ वनिता सुरवसे यांनी शिक्षक आणि विध्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव करून विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले.

सध्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेकडे पालकांचा ओघ वाढलेला दिसून येत आहे. त्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी संख्या घटत असून शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.याविषयी माझी मराठी शाळा हे गीत सादर करून विद्यार्थ्यांनी मराठी माध्यमाच्या शिक्षणाविषयी पालकाना जागृत केले. दिवसेन दिवस वृक्षतोड,जंगलतोड मोठ्या प्रमाणात करून सिमेंटचे जंगल उभारले जात आहेत त्यामुळे पर्जन्यमान कमी होऊन पाणीटंचाईला सामोरे जाण्याची वेळ येत आहे.याविषयी संत एकनाथ महाराजांच्या भारुड गीत प्रकारातून शालेय विद्यार्थ्यांनी वरूण राजाची माया संपली आकाश कोपलं पाणी हरवल पाणी हरवल हे भारुड गीत सादर करून पाणीटंचाई विषयी गावकऱ्यामध्ये जागृती करून दिली. तर बुरगुंडा होईल तुला हे भारुड गीत सादर करून बिराजदार या विद्यार्थ्याने उपस्थित सर्व प्रेक्षकांचे मने जिंकली.सर्वांना आपल्या कलेतून मंत्रमुग्ध केले व वन्स मोर चा सन्मान मिळवला. तसेच रडू नको बाळा मी पाण्याला जाते या गीतावर सामूहिक नृत्य सादर करून शालेय विद्यार्थिनींनी उपस्थित सर्व प्रेक्षकांचे लक्ष वेधले तर लावणी या नृत्य प्रकारातून आरोही अकाडे यांनी उत्कृष्ट नृत्य सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तर शालेय विद्यार्थ्यांनी मंचावर अक्षरशा रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांचा दरबार उभा करून व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या गीतावर उत्कृष्ट नृत्य सादर करून महामानवांच्या विचारांचा जागर केला.अशा प्रकारे एकाहून एक वरचढ कला सादर करून शालेय विद्यार्थ्यांनी त्यांच्या अंगी दडलेल्या सुप्त गुणांचे दर्शन घडविले.

एकूणच कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन करून शाळेचे श्री शंकर कारभारी यांनी पालकांना, ग्रामस्थांना, विद्यार्थ्यांना शेवटपर्यंत प्रसन्न ठेवले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहशिक्षिका भोसले मॅडम, यासह शालेय व्यवस्थापन समिती सर्व सदस्य परिश्रम घेतले. यावेळी पालक,गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, ग्रामस्थ,महिला युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निफाड नगरपंचायत कर वसुलीसाठी मुख्याधिकाऱ्यांचा थेट फील्ड दौरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

निफाड नगरपंचायतचे मुख्याधिकारी धिरज भामरे यांनी स्वतः फील्डवर उतरून निफाड शहरातील कर थकबाकीदार मालमत्ताधारकांच्या भेटी घेतल्या असून थकीत मालमत्ताधारकांना तात्काळ कर भरण्याचे आवाहन करत, कर भरून शहराच्या सर्वांगीण विकासात योगदान द्यावे, असे सांगितले.

नागरिकांनी कर भरला तरच नगरपंचायतला नागरिकांना उत्तम पायाभूत सुविधा पुरवणे शक्य होणार आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, ड्रेनेज व इतर नागरी सुविधा सक्षम करण्यासाठी कर वसुली अत्यंत आवश्यक असून

निफाड नगरपंचायतमार्फत सर्व विभागप्रमुखांच्या नेतृत्वाखाली विशेष कर वसुली पथके गठीत करण्यात आली. ही पथके निफाड शहरातील विविध भागांमध्ये थकबाकीदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन कर भरणेबाबत प्रभावी पाठपुरावा करीत आहेत.

कर वसुली मोहिमेत कर निरीक्षक राहुल लामखडे, प्रशासकीय अधिकारी शरद बोडके, लिपिक राजेंद्र भवर, अनिल कुंदे, . शरद काकुळते, नरेश धारराव, तसेच कर्मचारी भोसले व . मोगरे हे पथकासोबत उपस्थित होते.

# उल्हासनगर म.न.पा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विद्यालय शाळा क्रमांक २४ व १८ मध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे







भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त उल्हासनगर महापालिका शाळा क्रमांक २४ व १८ येथे ध्वजारोहण कार्यक्रम करण्यात आले यावेळी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी व पालक उपस्थित होते, स्थानिक सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकारी व शाळेचे आजी माजी विद्यार्थी व पालकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते, प्रजासत्ताक दिन सादर करत असताना विद्यार्थी यांच्याकडून सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

उल्हासनगर मनपा आयुक्त मनीषा आव्हाळे मॅडम यांनी सर्व मनपाच्या शाळा डिजिटल करण्याचा प्रयत्न करत आहेत, उल्हासनगर महापालिका साहित्य रत्न अण्णा भाऊ साठे शाळा या शाळे मध्ये डिजिटल स्क्रीन वर शाळेत शिक्षण दिले जात आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळत आहे, यावर्षी मनपा शाळांतील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले आहे आणि मनपाच्या ठाणे जिल्ह्यातून शैक्षणिक दौरा साठी चार विद्यार्थी यांची गुजरात दौऱ्यासाठी निवड झाली आहे, एवढी या शाळेचे कर्मचारी तसेच (मुख्याध्यापिका ) रागिनी गौतम लोखंडे मॅडम .विजया महेंद्र मोरे .

पल्लवी अभिषेक एडके . वनिता प्रकाश चामनर. स्नेहल गुरुनाथ विशे. धनाजी मंगा पवार . सुनिता विलास पाटील . रजनी राजेंद्र सोनवणे . वैशाली गोपाळ झोपे . तसेच पालक वर्ग आशुतोष मोरे महेंद्र मोरे पत्रकार शिवाजी मस्के सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पवार जगदीश आवारे अंकुश अस्वरे राहुल खरसान दिनेश राय शंकर गायकवाड उपस्थित होते

# वागदरी येथे जि.प.प्राथमिक शाळा सह विविध ठिकाणी प्रजासत्ताक दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


वागदरी/एस. के.गायकवाड : भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने वागदरीत तालुका तुळजापूर येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सह विविध ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरीच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिनानिमित्ताने शाळेचे मुख्याध्यापक बी.बी. सगर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय ध्वजारोहणासह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.






प्रारंभी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महादेव वाघमारे,उपाध्यक्ष कोमल झेंडर, मुख्याध्यापक बी.बी. सगर, पोलीस पाटील बाबुराव बिराजदार,ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पाटील,सह उपस्थित सर्व ग्रामपंचायतचे सदस्य तंटामुक्त समितीचे सदस्य आधी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व ध्वज कट्याचे पूजन करून शाळेचे मुख्याध्यापक बी.बी.सगर यांच्या शुभहस्ते राष्ट्रीय ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी सामुदायिक रित्या राष्ट्रगीत,राज्य गीत व संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन शालेय विद्यार्थ्यांच्या कवायतेचे सादरीकरण आधी कार्यक्रम यावेळी करण्यात आले.



या प्रसंगी सहशिक्षक डी.बी.अनपट,एन.एन.काळे, टी.एम.लोहार, सहशिक्षिका एस. एस. मसे,अगणवाडी कार्यकर्ती पद्मीनबाई पवार, मदतनिस पार्वतीबाई बिराजदार सह ग्रामस्थ विद्यार्थी मोठ्या सख्येने उपस्थित होते.

तसेच ग्रामपंचायत कार्यालय वागदरी तालुका तुळजापूरच्या प्रांगणात ग्रामपंचायतीच्या वतीने प्रजासत्ताक दिना निमित्त राष्ट्रीय ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते प्रारंभी भारतीय घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन येथील सर्व ग्रामपंचायत सदस्य व माजी तंटामुक्त अध्यक्ष तथा सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या हस्ते ध्वज कट्याचे व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्य प्रतिमेचे पूजन करून सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या शुभहस्ते राष्ट्रीय ध्वजारोहण करण्यात आले.

या प्रसंगी शालेय विद्यार्थ्यांनी सामुदायिक रित्या राष्ट्रगीत संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन राज्य गीताचे सादरीकरण व शालेय विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाच्या खेळाचे सादरीकरण केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पाटील अमोल पवार सुरेखाताई यादव मीनाक्षीताई बिराजदार मुक्ताबाई बिराजदार सह ग्रामस्थ महिला विद्यार्थी युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी उपसरपंच दत्ता सुरवसे यांनी केले.

त्या प्रमाणे येथील भीम नगर मध्ये पंचशील बुद्ध विहार समाज मंदिराच्या प्रांगणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटीच्या वतीने प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक बी.बी. सगर सेवानिवृत्त पोलीस हवालदार संदिपान वाघमारे ग्रा.प सदस्य ज्ञानेश्वर पाटील माजी सरपंच नागनाथ बिराजदार ग्रा. प. सदस्य सुरेखाताई यादव, मीनाक्षीताई बिराजदार,मुक्ताबाई बिराजदार,सीआरपी विद्याताई बिराजदार,आदी मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी सामुदायक रित्या संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले तर शालेय विद्यार्थ्यांनी राज्य गीताचे सादरीकरण केले याप्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.यावेळी चंद्रकांत वाघमारे,अनिल वाघमारे, सूर्यकांत वाघमारे, सहादेव वाघमारे,उज्वला वाघमारे, गीताबाई झेंडारे, कमळाबाई वाघमारे,शुष्मा वाघमारे विजयाबाई वाघमारे कोमल झेंडारे सह शाळेचे सर्व शिक्षक विद्यार्थी ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्र संत्रसंचलन रिपाइं (आठवले) चे धाराशिव जिल्हा सचिव तथा पत्रकार एस. के.गायकवाड यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण संपन्न

## पोलीस, गृहरक्षक दल, एनसीसी, स्काऊट तसेच विद्यार्थ्यांनी दिली मानवंदना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर दि. २६:- भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण संपन्न झाले.

रेल्वे मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या या शासकीय सोहळ्यात एकूण ३६ पथकांनी सहभाग घेतला होता. यावेळी पोलीस, गृहरक्षक दल, एनसीसी, स्काऊट तसेच शहरातील विविध विद्यालयाच्या विध्यार्थी-विद्यार्थ्यीनी यांच्या पथकाने केलेल्या संचलनाचे प्रांताधिकारी श्री. इथापे यांनी निरिक्षण करुन मानवंदना स्विकारली.

शासकीय ध्वजारोहण समारंभास आमदार अभिजीत पाटील, नगराध्यक्षा प्रणितीताई भालके, माजी आमदार प्रशांत परिचारक, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.प्रशांत डगळे, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारीअमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, दीपक शिंदे, डी.एस.आसवले, वैभव बुचके, आणीबाणीत करावास भोगलेले लक्ष्मीकांत गडम, अशोक क्षीरसागर, श्रीमती. रुक्मिणी पांडुरंग देशपांडे, सुभद्रा मेटकरी, भालचंद्र कुलकर्णी यांच्यासह नगरसेवक, स्वांतत्र्यसैनिक, पदाधिकारी, शासकीय अधिकारी- कर्मचारी, तसेच मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संविधान उद्देशिकाचे वाचन करुन उपस्थितांना ध्वज प्रतिज्ञा, बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा देण्यात आली तसेच व्यसनमुक्तीची व कुष्ठरोगमुक्तीची शपथ घेतली. त्याचबरोबर पोलीस दलाच्या वतीने राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली.

यावेळी प्रांताधिकारी इथापे यांच्या हस्ते सहभागी पथकांना प्रमाणपत्र आणि मानचिन्ह देण्यात आले

# प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन; श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास येथे ध्वजारोहण संपन्न

## अन्नछत्रात गोड पदार्थाचा समावेश, श्री विठ्ठल रुक्मिणी मातेस अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास येथे भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. श्री ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे, प्र. व्यवस्थापक संदेश भोसले, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख पृथ्वीराज राऊत, संजय कोकीळ, राजेंद्र सुभेदार, बलभिम पावले, विनोद पाटील, भिमाशंकर सारवाडकर, राजेश पिटले, पांडूरंग बुरांडे, अतुल बक्षी, सावता हजारे, राजेंद्र घागरे, शंकर मदने तसेच मंदिर समितीचे अधिकारी व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.



प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मंदिर परिसर व श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास संपूर्णपणे तिरंगा रंगाची आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता. तसेच फुलांची नयनरम्य आरास करण्यात आल्याने परिसरात देशभक्तीपर वातावरण निर्माण झाले होते. याशिवाय, मंदिर समितीच्या श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रामध्ये भाविकांसाठी भोजनप्रसादात गोड पदार्थाचा समावेश करण्यात आला होता. याचा सुमारे दोन हजार भाविकांनी लाभ घेतला. दर्शनरांगेतील वाढती गर्दी लक्षात घेऊन भाविकांसाठी चहापान तसेच खिचडी वाटपाची व्यवस्था देखील करण्यात आली आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मातेस अलंकार परिधान करण्यात आले होते. श्री विठ्ठलास सोने मुकुट, बालाजी नाम, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हिऱ्याचा कंगन जोड, मोत्याचा तुरा, शिरपेच, मत्स्य जोड, तोडे जोड, तुळशीची माळ, मोहरांची माळ, अष्टपैलू मण्याची कंठी, पदकासह लॉकेट, तांदळ्या हार, सूर्यकळ्याचा हार, झनक हार आदी तसेच श्री रुक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, तांबडी चिंचपेटी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले होते.

# घोटी जनता विद्यालयात प्रजासत्ताकदिन विविध उपक्रमांनी उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : घोटी येथील जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेज तसेच अभिनव बाल विकास मंदिर मध्ये प्रजासत्ताकदिन उत्साहात साजरा करण्यात आला. ढोल ताशाच्या गजरात विद्यार्थ्यांनी घोषणा देत गावातून प्रभात फेरी काढली.राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण कार्यक्रमाचे अध्यक्ष व मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे तालुका संचालक ड. संदीप भाऊ गुळवे यांच्या हस्ते करण्यात आले. ध्वजपूजन शालेय समितीचे अध्यक्ष मनोज भाऊ जाधव व उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष राजेंद्र आप्पा जाधव यांच्या हस्ते करण्यात आले .व्यासपीठावर माजी आमदार शिवराम झोले,पंचायत




समितीचे माजी सदस्य अण्णा पवार, पोलिस निरीक्षक विजय शिंदे,उपनिरीक्षक श्री.भिंगरदे, शालेय समितीचे सदस्य गणपत राव,सागर हांडे,योगेश जाधव,नरेंद्र मेधने,दीपा कंदकुरीवार ,सुनीता सिंघल,स्वातीताई कडू,वैशाली गोसावी,पालक-शिक्षक संघाचे उपाध्यक्ष गोरक्षनाथ गव्हाणे, माता-पालक संघाच्या उपाध्यक्षा सुनिता वाघचौरे,दत्तात्रय भोर,रामदास भोर,केंद्रप्रमुख राजेश खैरनार,प्राचार्य नितीन भामरे, उपमुख्याध्यापक उल्हास पवार , पर्यवेक्षक हिरामण चौधरी ,मुख्यलिपीक भाऊसाहेब रणशेवरे आदी मान्यवर उपस्थित होते.विद्यार्थ्यांसह उपस्थित मान्यवर व पालकांना संविधान प्रतिज्ञा श्रीमती एम.आर. सोनवणे यांनी दिली . गायत्री सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांसह पालकांना कॉपीमुक्त अभियान शपथ तसेच असाक्षर मुक्त गाव शपथ / साक्षरतेची शपथ दिली. संगीतशिक्षक प्रकाश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत,ध्वजगीत, राज्यगीत व देशभक्तीपर गीते सादर केली. क्रीडा शिक्षिका वंदना जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर उत्कृष्ट संगीत कवायत सादर केली. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. सूत्रसंचालन सोमनाथ गिरी यांनी तर आभार अनिता राठोड यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षिका,शिक्षकेतर सेवक यांनी परिश्रम घेतले.यावेळी शालेय समितीचे सदस्य, ग्रामपंचायतीचे सदस्य, विविध संस्थेचे पदाधिकारी, विविध मंडळाचे पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, शिक्षक, शिक्षकेतर सेवक, ग्रामस्थ ,संस्थेचे सभासद ,हितचिंतक व देणगीदार उपस्थित होते.

# गणेशोत्सवाच्या उरलेल्या निधीतून 'लाईनमन'ना सुरक्षेचे कवच

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी. :तालुक्यातील येणेगूर येथील महावितरणमध्ये कार्यरत असलेल्या लाईनमनच्या सुरक्षिततेचा विचार करून, प्रजासत्ताक दिनाचे अवचित साधून येणेगूर शाखेचे प्रधान तंत्रज्ञ देविदास कांबळे यांच्या संकल्पनेतून सर्व लाईनमनना 'शॉर्टिंग रॉड' भेट देण्यात आले. वीज वाहिनीवर काम करताना होणारे अपघात टाळण्यासाठी हे साधन अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

अनेकदा तांत्रिक बिघाड दुरुस्त करताना लाईनमनना आपला जीव धोक्यात घालून काम करावे लागते. अशा वेळी अनपेक्षित विद्युत प्रवाहापासून संरक्षण मिळवण्यासाठी शॉर्टिंग रॉड हे एक आवश्यक सुरक्षा कवच आहे.

येणेगूर येथील महावितरण कर्मचारी गणेश मंडळाने यंदाच्या गणेशोत्सवातील देणगीतून शिल्लक राहिलेल्या रकमेतून व कांबळे यांनी स्वखर्चाने लाईन टेस्टर आवश्यक सुरक्षा साधनांचे वाटप करण्यात आले.



उत्सवातील पैसा वायफळ खर्च न करता तो अशा पद्धतीने समाजातील घटकांसाठी वापरल्याबद्दल या मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे. इतर मंडळांनीही अशाच प्रकारे समाजहिताचे निर्णय घ्यावेत, असा सूर या निमित्ताने उमटत आहे.

**कर्तव्याला सुरक्षेची साथ**

दिवस-रात्र, पाऊस-वादळ परिस्थितीत लाईनमन आपला जीव धोक्यात घालून वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याचे काम करतात. अनेकदा अपुऱ्या साधनांअभावी त्यांच्या जीविताला धोका निर्माण होतो. ही बाब लक्षात घेऊन प्रधान तंत्रज्ञ देविदास कांबळे यांनी सर्व कर्मचाऱ्यांना मदत करण्याचा निर्णय घेतला. यावेळी महावितरणचे अभियंता पंकज घंटे व प्रधान तंत्रज्ञ देविदास कांबळे यांच्या हस्ते हे सुरक्षा साहित्य प्रदान करण्यात आले. यावेळी सुरेश गायकवाड, बालाजी जाधव, पवन गुरव, अतिश ठाकूर, गणेश सोनटक्के, इस्माईल पटेल यांच्यासह विज कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बोरिवली ग्रामपंचायतीत ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील बोरिवली ग्रामपंचायतीच्या वतीने ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या प्रांगणात झालेल्या प्रमुख कार्यक्रमात परिसरातील विविध शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभातफेरीच्या माध्यमातून 'सर्वधर्मसमभाव' आणि 'संविधान मूल्यांचा सन्मान' हा



सामाजिक संदेश प्रदर्शित करण्यात आला. कार्यक्रमात बोरिवली ग्रामपंचायतीचे सरपंच अनवर पिंजारी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तत्पूर्वी बोरिवली ग्रामपंचायत हद्दीत प्रभातफेरी आयोजित करण्यात आली होती. 'प्रजासत्ताक दिनाचा विजय असो' व 'भारतीय संविधानाचा विजय असो' अशा जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुले होते. विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी देशप्रेम, एकता आणि बंधुत्व यांवरील आशयपूर्ण पोस्टरच्या माध्यमातून सामाजिक संदेश दिला. कार्यक्रमानंतर बोरिवली ग्रामपंचायतीतर्फे उपस्थित विद्यार्थी व नागरिकांना अल्पोपहार वाटप करण्यात आले. या प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य, माजी सदस्य, नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, पोलिस कर्मचारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सदर कार्यक्रम ग्रामपंचायतीचे पंचायत अधिकारी गणेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते अँड. जियाद सोहराब गुजर तसेच ग्रामपंचायतीचे सदस्य व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# राज्यघटनेने भारतीयांना जगण्याचे अधिकार दिले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : मणुष्य म्हणून जगण्या साठी आवश्यक सर्व अधिकार भारतीय राज्यघटनेने जनतेला दिले. त्यामुळेच समाजिक समानता निर्माण होऊन देश प्रगती करीत आहे असे विधान जयंत शिक्षण संस्था आमगाव सचिव व पंचशील हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मक्काटोलाचे संस्थापक दिलिप मेश्राम यांनी केले. ते अध्यक्षीय स्थानावरुन बोलत होते.




या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रभारी प्राचार्य एम. जी. कांबळे, भजेपार येथील सरपंच चंद्रकुमार बहेकार, मक्काटोला च्या सरपंच सौ अनिता फुंडे, शेरपार चे सामाजिक कार्यकर्ते अमृतलाल बिसेन, मनिषा बिसेन अमोल फुन्डे, ममता बडोले उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलिप मेश्राम यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांना

**दिलीप मेश्राम यांचे प्रतिपादन : पंचशील विद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा**

दिप प्रज्वलन आणि माल्यार्पण करून ध्वजारोहन करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर नृत्य सादर केले. गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले विद्यालयाच्या 'संकल्प' या हस्तलिखिताचे प्रकाशन सुध्दा करण्यात आले. राज्यस्तरीय संविधान गुण गौरव परीक्षेतील कमांक प्राप्त विद्यार्थ्यांना तसेच केंद्र प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडणारे शिक्षक अजय मेश्राम यांना पदक व प्रमाणपत्र देवून गौरवण्यात आले त्याचप्रमाणे भूगोल व विज्ञान परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक टी. के. चौधरी व पी एम कोरे यांना पदक व प्रमाणपत्र प्रदान करण्यात कार्यक्रमाचे सूत्र संचालन शिक्षक अजय मेश्राम यांनी केले व आभार प्रदर्शन शिक्षक मधुकर कुरसुंगे यांनी केले.

## पुण्यातील राज इंडस्ट्रिजचे टॅलेंट लर्निंग अँड ऑर्गनायझेशन डेव्हलपमेंटचे व्यवस्थापकीय सहसंचालक योगेश खताळे यांच्या हस्ते ध्वजारोहण





# स्वेरीमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूरः गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या भव्य प्रांगणात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

स्वेरीचे संस्थापक व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यातील राज इंडस्ट्रिजचे टॅलेंट लर्निंग अँड ऑर्गनायझेशन डेव्हलपमेंटचे व्यवस्थापकीय सहसंचालक योगेश खताळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. भारतमातेच्या प्रतिमा पूजनाने या कार्यक्रमाला सुरवात झाली. स्वेरीचे विद्यार्थी आदित्य मेडशिंगकर, मुग्धा कोरे, वैष्णवी आवताडे, प्रितम बढे यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त केलेल्या भाषणांतून भारतातील विविध क्षेत्रातील वस्तुस्थिती, युवकांवरील जबाबदारी, भारतीय संस्कृती, शिक्षण, आरोग्य, क्रीडा आदी विषयावर उत्तम पद्धतीने विचार मांडले. विद्यार्थी गोविंद व ऐश्वर्या यांनी 'भारत हमारी मा है....' हे गीत गायले तर प्राजक्ता दिवेकर यांनी 'तिरंगा माझा श्वास आहे, भारत माझा विश्वास' ही कविता सादर केली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे योगेश खताळे म्हणाले की, 'स्वेरी मध्ये मला आज भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्याची संधी दिली त्याबद्दल प्रथम सर्वांचे आभार मानतो. आज आपणा सर्वांना अभिमान वाटतो की आपण अशा देशाचे नागरिक आहोत, जो देश उत्तरोत्तर चांगली प्रगती साध्य करत आहे. आज आपण जगामध्ये एक सक्षम देश म्हणून पुढे येत आहोत. जगातल्या अनेक देशामध्ये फिरून आल्यावर मला भारतात एक वेगळी सकारात्मकता जाणवते. आज आपण एक तरुणांचा देश आहोत. मानवासाठी जगाला अजून चांगले स्थान बनवण्यासाठी आपण भारतीय लोक अतिशय चांगले योगदान देऊ शकतो.' प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विविध विभागांच्या संशोधन पत्रिकांचे व 'स्वेरीयन' या त्रैमासिकाचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

तसेच 'विकसित भारत २०४७' या अभियानाचा एक भाग म्हणून 'समर्थ विद्यार्थी, समर्थ भारत' या उपक्रमाअंतर्गत सर्व विद्यार्थी व उपस्थितांना शपथ देण्यात आली. यावेळी सचिव डॉ. सुरज रोंगे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एम.पवार, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस. व्ही. मांडवे, इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम.एस.मठपती, सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व चारही महाविद्यालयांचे विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माहेश्वरी धनवले, किर्ती भोसले व डॉ.यशपाल खेडकर यांनी केले तर डिप्लोमाच्या विद्यार्थी सचिवा वैष्णवी नवले यांनी आभार मानले.

# माघ यात्रेसाठी मंदीर प्रशासन सज्ज, मंदिर समितीची जय्यत तयारी : गहिनीनाथ महाराज औसेकर

## माघ यात्रेसाठी भाविकांना आवश्यक सोई सुविधा उपलब्ध, भाविकांच्या सुविधेसाठी १२०० कर्मचारी व स्वयंसेवकांची नियुक्ती: चार अतिरिक्त पत्राशेड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : माघ यात्रा दरवर्षी चैत्र शुध्द ११ जया एकादशी या दिवशी भरते. माघी यात्रा दिनांक २९ जानेवारी, रोजी असून, या यात्रा कालावधीत सुमारे ३ ते ४ लाख भविक श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येतात . यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांना सुलभ व जलद दर्शनाबरोबरच आवश्यक सोयी-सुविधा मंदिर समितीच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

या यात्रा कालावधीत श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिराशी संबंधित असलेल्या परंपरांचे कटाक्षपणे पालन करण्यात येणार असून, त्याबाबतचे आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये नवमीला श्री.ह.भ.प. वासकर महाराज यांची दिंडीं, ह.भ.प. आजरेकर महाराज पंढरपूर यांचा व्दादशीला नैवेद्य, त्रयोदशीला श्री.ह.भ.प.औसेकर महाराज यांचे चक्रीभजन करण्याची परंपरा असून, एकादशीला पहाटे श्री विठ्ठल रूक्मिणी मातेची नित्यपूजा मंदिर समिती मार्फत संपन्न होत आहे.

आपत्कालिन व्यवस्थेच्या दृष्टीने सोलापूर महानगरपालिका यांचेकडील रेस्क्यू व्हॅन प्रशिक्षित कर्मचा-यासह, सिझफायर यंत्रणा, अत्याधुनिक १०० नग सीसीटीव्ही कॅमेरे व त्यासाठी कंट्रोल रूम, वायरलेस यंत्रणा, जनरेटर, मेटल डिटेक्टर, मोबाईल लॉकर, चप्पल स्टँड, सार्वजनिक प्रसारण सुचना प्रणाली, चौकशी कक्ष, बँग स्कॅनर मशिन, अपघात विमा पॉलीसी इ. व्यवस्था करण्यात आली आहे. आरोग्य व्यवस्थेसाठी पत्राशेड येथे तालुका आरोग्य विभागाचा वैद्यकीय कक्ष, उपजिल्हा रूग्णालया मार्फत दर्शनमंडप येथे आयसीयू तसेच वैष्णव चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्याकडून मोफत वैद्यकीय सेवा व मंदिर परिसरात वैद्यकीय पथकासह दोन अद्यावत रूग्णवाहिका सज्ज ठेवण्यात येत आहेत.

स्वच्छतेसाठी मंदिर, दर्शनमंडप, तुकाराम भवन येथील स्वच्छता मंदिर कर्मचा-यांमार्फत व नगरप्रदक्षिणा, दर्शनरांग, मंदिर प्रदक्षिणा आदी ठिकाणची स्वच्छता आउट सोर्सिंग पद्धतीने करण्यात येत आहेत. या कामी स्वकाम सेवा आळंदी व संत ज्ञानेश्वर सेवा मंडळ आळंदी या स्वयंसेवी संस्थाची मदत घेण्यात येत असून, स्वच्छतेसाठी विशेष लक्ष देण्यात येत आहे. तसेच अन्नछत्रामध्ये दु.१२.०० ते २.०० व रा.७.०० ते ९.०० या वेळेत अन्नदान सुरू राहणार असून, दर्शनरांगेत चहापान, तांदळाची









अथवा शाबुदाणाची खिचडी वाटप करण्यात येत आहे असे व्यवस्थापक संदेश भोसले यांनी सांगीतले.

दर्शनरांग व्यवस्थापनाच्या दृष्टीने स्कायवॉक पासून पत्राशेड पर्यंत बॅरीकेटींग करून त्यावर ताडपत्री टाकणे व कायमस्वरूपी ४ पत्राशेड येथे तात्पुरते ४ असे एकूण ८ पत्राशेड उभारण्यात रश्रश आहेत. या दर्शनरांगेत मॅट, बसण्याची सुविधा, थंड पिण्याचे पाणी, तात्पुरते उड्डाणपुल, शौचालये, विश्रांती कक्ष, बाथरूम, लाईव्ह दर्शन इ. सुविधा उपलब्ध आहेत. याशिवाय, महिला भाविकांच्या सोईसाठी सॅनिटरी नॅपकीन, हिरकणी कक्ष तसेच श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी व राजगिरा लाडूप्रसादाची उपलब्धी तसेच वेदांता, व्हीडीओकॉन व श्री.विठ्ठल रूक्मिणी या ३ भक्तनिवासामधील ३६१ रूममध्ये सुमारे १६०० भाविकांची निवास व्यवस्था करण्यात येत आहे.

श्रीची दर्शन रांग सुलभ व जलद गतीने चालवण्यासाठी अनुभवी कमांडोजची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच भाविकांच्या शुभहस्ते होणाऱ्या पूजेची संख्या कमी करून, व्हीआयपी दर्शनावर निर्बंध व दर्शनाची वेळ वाढवून सकाळी ६.०० ते रात्री १२.०० करण्यात आली आहे. सदर यात्रा निर्विघ्नपणे - सुरळीत पार पाडण्यासाठी व भाविकांना केंद्रबिंदू मानून त्यांना अधिकाधिक सोई सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मंदिर समितीचे सदस्य, अधिकारी, विभाग प्रमुख, कर्मचारी वर्ग परिश्रम घेत असून, १२०० कर्मचारी व स्वयंसेवक सेवा पार पाडणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

---

# शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकाचा जागतिक डंका; बायोमासपासून औषधनिर्मितीच्या नव्या पद्धतीला 'युनायटेड किंगडम' कडून पेटंट प्राप्त



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे येथील संशोधक विद्यार्थी आणि शिवाजी विद्यापीठाचे सुपुत्र ललित भोसले यांनी रसायनशास्त्राच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर ऐतिहासिक कामगिरी केली आहे. बायोमासपासून (Biomass) प्राप्त होणाऱ्या 'हायड्रॉक्सी मिथिल फरफुराल' (HMF) चा वापर करून औषधनिर्माण क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचे असलेले 'हायड्राझिनिल थायाझोल' तयार करण्याच्या पर्यावरणपूरक पद्धतीला संयुक्त राष्ट्र (युनायटेड किंगडम - UK) कडून प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पेटंट बहाल करण्यात आले आहे.

**संशोधनाचे वेगळेपण: 'ग्राइंडस्टोन केमिस्ट्री'चा वापर**

ललित भोसले यांच्या या संशोधनात 'ग्राइंडस्टोन केमिस्ट्री' (Grindstone Chemistry) या अत्यंत सोप्या आणि पर्यावरणपूरक तंत्राचा वापर करण्यात आला आहे. सामान्यतः रासायनिक प्रक्रियांमध्ये घातक सॉल्व्हेंट्स (Solvents) आणि कॅटालिस्टचा (Catalyst) वापर केला जातो, ज्यामुळे पर्यावरणाची हानी होते. मात्र,

**बार्टी पुणे संस्थेच्या पाठबळाने ललित भोसले यांचे जागतिक यश**

भोसले यांनी विकसित केलेल्या या पद्धतीत कोणत्याही कॅटालिस्ट किंवा सॉल्व्हेंटशिवाय, अतिशय कमी वेळेत उत्कृष्ट दर्जाचे उत्पादन (Yield) मिळवण्यात यश आले आहे.

**औषधनिर्माण क्षेत्रात क्रांती**

या संशोधनाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे बायोमासपासून मिळविलेल्या फुरफुरालचा वापर करून संशोधकांनी हायड्राझिनिल थायाझोल संयुगांची एक मोठी 'लायब्ररी' तयार केली आहे. ही संयुगे औषधनिर्माण क्षेत्रात अँटी-बॅक्टेरियल, अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-कॅन्सर (कर्करोग प्रतिबंधक) उपचारांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत.

**बार्टी (BRTI) संस्थेचे मोलाचे सहकार्य**

हे संशोधन कार्य यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी ललित भोसले यांना बार्टी, पुणे येथील वरिष्ठ प्रशासनाचे अत्यंत मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. यामध्ये विशेषतः: बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे, निबंधक तथा अधिछात्रवृत्ती विभागप्रमुख विशाल लोंढे, प्रकल्प व्यवस्थापक डॉ सारिका थोरात, आणि सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक डॉ अंकुश गायकवाड यांच्या निरंतर पाठबळामुळे आणि प्रोत्साहनामुळे हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन पूर्ण होऊ शकले, अशी कृतज्ञता ललित भोसले यांनी व्यक्त केली आहे. या यशाबद्दल मा महासंचालक यांनी बार्टीचे संशोधक विद्यार्थी ललित भोसले यांचे अभिनंदन करून पुढील संशोधनासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

---

# श्री विठ्ठल अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वाहन कर्ज योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : श्री विठ्ठल अर्बन को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी पंढरपूर यांच्या वतीने सभासद व ग्राहकांसाठी वाहन कर्ज योजना सुरू करण्यात आली आहे.

या वाहन कर्ज योजनेच्या माध्यमातून लाभार्थी ठरलेले ज्ञानेश्वर भगवान बागल यांना चेअरमन नागेश फाटे यांच्या हस्ते टाटा नेक्सन ही चार चाकी वाहन वितरण करण्यात आले.




या वाहन कर्ज योजनेच्या माध्यमातून सभासदांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करून त्यांना व्यवसाय, रोजगार व दैनंदिन गरजांसाठी वाहन मिळवून देणे हे मुख्य उद्दिष्ट असून सभासदांनी या योजनेअंतर्गत लाभ घ्यावा. असे आवाहन श्री.विठ्ठल अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वतीने करण्यात आले.

या कार्यक्रमास श्री विठ्ठल अर्बन को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे चेअरमन नागेश फाटे, सचिव डॉ. रमेश फाटे मॅनेजर संग्राम कापसे, अधिनाथ बागल, विनय शिंदे, सुमित बागल, ज्ञानेश्वर पवार, स्वप्नाली घोडके मॅडम, श्रीधर पिसे, किशोर नपते उपस्थित होते.

---

# ऋतुजा धुमाळची १० मीटर पिस्टल शूटिंग मध्ये राष्ट्रीय पातळीवर निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयातील बी.कॉम भाग दोन मधील विद्यार्थिनी ऋतुजा धुमाळ हिची उत्तर प्रदेश मधील मेरठ येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ १० मीटर पिस्टल शूटिंग या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयात तिचा गौरव करण्यात आला. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांच्या हस्ते ऋतुजा धुमाळ हिचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बी. एस. बळवंत, कॉमर्स विभागाच्या डॉ. सारिका केदार, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अनिल परमार प्रा. विठ्ठल फुले व प्रा. मनोज खपाले सर उपस्थित होते. ऋतुजा हिला या सर्व मार्गदर्शक प्राध्यापकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून तिच्या मेहनतीचे व सातत्याचे हे फळ आहे. या निवडीबद्दल प्राचार्यांसह महाविद्यालयाचे सर्व उपप्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर सेवक वर्गाने तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

---

# कळंब तालुक्यात प्रजासत्ताक दिनी शासकीय इमारतीवर राष्ट्रध्वज उभारला नाही




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : भारत देशाला ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाले तेव्हा स्वतंत्र भारताला स्वतःचे संविधान नव्हते. भारत देशाचे कायदे हे १९३५ सालच्या कायद्यावर आधारित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसूदा समिती स्थापन केली गेली. या समितीने संविधानाचा मसुदा तयार करून तो सभेपुढे सादर केला. सभेने बरेचसे विचार विमर्श आणि सुधारणा केल्यानंतर समितीच्या ३०८ सदस्यांनी दोन हस्तलिखित प्रती हिंदी आणि इंग्रजी स्वाक्षरांकित केल्या. त्यानंतर २६ जानेवारी रोजी, भारताचे संविधान संपूर्ण देशासाठी लागू करण्यात आले. तेव्हा पासून देशात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

**ध्वजासाठीचे लोखंडी पाईप रिकामेच; संबंधित विरुद्ध गुन्हे दाखल करा : राहुल मुळे**

महाराष्ट्र शासनाने २१ जानेवारी रोजी शासन परिपत्रक निर्गमित करुण सर्व शासकीय कार्यालय येथे राष्ट्रध्वज उभारून ध्वजवंदन करण्याचे आदेश दिले होते. परंतु कळंब तालुक्यातील अनेक शासकीय इमारतीवर राष्ट्रध्वज उभारण्यात आला नाही. ज्यामध्ये वाकडी, हासेगाव (केज), आंदोरा, व खामसवाडी येथील आरोग्य उपकेंद्र येथील राष्ट्रध्वज उभारण्यासाठी लावण्यात आलेले लोखंडी पाईप रिकामेच असल्याचे निदर्शनास आले. त्या सर्व आरोग्य उपकेंद्र प्रमुख विरुद्ध शासन आदेशाचा अवमान केल्या प्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी तक्रार कळंब येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल मुळे यांनी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे केली आहे. सदरील निवेदनावर राहुल मुळे यांची स्वाक्षरी आहे.

---

## १२९ घरकुलांपैकी ८७ पूर्ण; लाभार्थ्यांचा सन्मान, वाचनालयाचे उद्‌घाटनही संपन्न

# कोठुरे येथे प्रधानमंत्री आवास योजनेचा गृहप्रवेश सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : ग्रामपंचायत कोठुरे, तालुका निफाड येथे प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत सन २०२४-२५ मधील मंजूर घरकुल लाभार्थ्यांचा गृहप्रवेश सोहळा आज दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मोठ्या उत्साहात पार पडला.

हा सोहळा आमदार दिलीपराव शंकरराव बनकर यांच्या शुभहस्ते व राजेंद्र सदाशिव डोखळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून गटविकास अधिकारी श्रीमती नम्रता जगताप व मा. सहाय्यक गटविकास अधिकारी सुनील पाटील उपस्थित होते.




कोठुरे येथे एकूण १२९ घरकुले मंजूर असून त्यापैकी ८७ घरकुले पूर्ण झाली आहेत, तर उर्वरित घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत. कार्यक्रम प्रसंगी आमदार दिलीप काका बनकर यांच्या हस्ते लाभार्थ्यांचा विधिवत गृहप्रवेश करून त्यांना घराची चावी व घरबांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

याच कार्यक्रमात मा. मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या प्रेरणेतून साकार झालेल्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले वाचनालयाचे उद्घाटन देखील करण्यात आले, ज्यामुळे गावातील शैक्षणिक व सांस्कृतिक वातावरणाला नवी दिशा मिळणार आहे.

कार्यक्रमास विस्तार अधिकारी (ग्रा.प.) संजय पवार, राजेश थोरात, बोरसे, कनिष्ठ अभियंता श्रीमती ललवाणी, सरपंच सरला उत्तम बुटे, उपसरपंच ज्योती बाळू पवार, जयश्री मोगल, नवनाथ मोगल, मच्छिंद्र कोकाटे, बाळू बेंडकुळे, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती आरती दिघे, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्राम पंचायत कोठुरेच्या वतीने विशेष परिश्रम घेण्यात आले असून, या सोहळ्यामुळे लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान स्पष्टपणे दिसून येत होते.